**प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE**

**भारतीय रिज़र्व बैंक**
**RESERVE BANK OF INDIA**
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

फेब्रुवारी 23, 2017

**सार्वभौम सुवर्ण रोखे योजना 2016-17 - मालिका 4**

भारत सरकारशी सल्लामसलत करुन, भारतीय रिझर्व बँकेने सार्वभौम सुवर्ण रोखे 2016-17, मालिका 4 देण्याचे ठरविले आहे. ह्या रोख्यांसाठीचे अर्ज, फेब्रुवारी 27, 2017 ते मार्च 3, 2017 पर्यंत स्वीकारले जातील. हे रोखे मार्च 17, 2017 रोजी दिले जातील. ह्या रोख्यांची विक्री, बँका, स्टॉक होल्डिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (एसएचसीआयएल), नेमलेली पोस्ट ऑफिसे आणि मान्यताप्राप्त स्टॉक एक्सचेंजेस (म्हणजे, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लि., व बाँबे स्टॉक एक्सचेंज) मार्फत केली जाईल. ह्या रोख्यांची लक्षणे/गुणविशेष पुढीलप्रमाणे आहेत.

| अनु क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| 1 | उत्पादाचे नाव | सार्वभौम सुवर्ण रोखे 2016-17 - मालिका 4 |
| 2 | प्रचालन/देणे | भारत सरकारच्या वतीने, भारतीय रिझर्व बँके कडून दिले जातील |
| 3 | पात्रता | व्यक्ती, एचयुएफ, ट्रस्ट, विश्वविद्यालये व धर्मादाय संस्था ह्यासह, हे रोखे, निवासी भारतीय संस्थांनाच विकण्यात येतील. |
| 4 | मूल्य | हे रोखे, 1 ग्राम ह्या एककाच्या पटीत (ग्राम्स मध्ये) मूल्यांकित असतील. |
| 5 | मुदत | ह्या रोख्यांची मुदत 8 वर्षांची असेल आणि त्यातून मुक्त होण्याचा पर्याय 5 व्या वर्षापासून, व्याज प्रदान करावयाच्या दिवशी वापरता येईल. |
| 6 | किमान आकारमान | परवानगीप्राप्त किमान गुंतवणुक 1 ग्राम सोने असेल. |
| 7 | कमाल मर्यादा | कोणत्याही संस्थेकडून वर्गणी साठीची कमाल रक्कम, प्रति व्यक्ती, प्रति आर्थिक वर्षासाठी (एप्रिल-मार्च) 500 ग्राम्सपेक्षा अधिक नसेल. अशा अर्थाचे स्वयं-घोषणापत्र घेण्यात यावे. |
| 8 | संयुक्त धारक | संयुक्त धारणाच्या बाबतीत, 500 ग्रामची गुंतवणुक मर्यादा केवळ प्रथम अर्जदारालाच लावली जाईल. |
| 9 | देण्याचे मूल्य | ह्या रोख्याचे मूल्य/किंमत भारतीय रुपयांमध्ये, वर्गणी-कालावधीच्या आदल्या आठवड्यासाठी, (सोमवार ते शुक्रवार) इंडियन बुलियन्स अँड ज्वेलर्स असोशिएशन लि. ह्यांनी, प्रसिध्द केलेल्या 999 शुध्दतेच्या सोन्याच्या बंद बाजारभावाच्या साध्या सरासरी एवढे |

| | | |
|---|---|---|
| | | असेल. **ह्या सुवर्ण रोख्यांच्या देण्याचे/प्रचालनाचे मूल्य, रु.50 प्रति ग्राम वजा त्याची नाममात्र किंमत एवढे असेल.** |
| 10 | प्रदानाचा पर्याय | ह्या रोख्यांसाठीचे प्रदान रोख रकमेने (जास्तीत जास्त रु.20,000/-) किंवा डिमांड ड्राफ्टने किंवा चेकने किंवा इलेक्ट्रॉनिक बँकिंग मार्फत केले जावे. |
| 11 | देण्याचे स्वरुप | हे सुवर्ण रोखे, जीएस अधिनियम, 2006 खाली भारत सरकारचे स्टॉक्स म्हणून दिले जातील. त्यासाठी निवेशकांना धारण प्रमाणपत्रे दिली जातील. हे रोखे, डिमॅट स्वरुपातही रुपांतरण करण्यास पात्र आहेत. |
| 12 | विमोचन मूल्य | ह्या रोख्यांच्या विमोचनाची किंमत, आयबीजेएने प्रसिध्द केलेल्या 999 शुध्दतेच्या सोन्याच्या मागील आठवड्यामधील बंद बाजारभावाच्या साध्या सरासरीने, रुपयांमध्ये दिली जाईल. |
| 13 | विक्रीची वाहिनी | हे रोखे, बँका, स्टॉक होल्डिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (एसएचसीआयएल), नेमलेली पोस्ट ऑफिसे आणि मान्यताप्राप्त स्टॉक एक्सचेंजेस (म्हणजे नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया व बाँबे स्टॉक एक्सचेंज) ह्यांच्या मार्फत, थेट किंवा त्यांच्या एजंटांकडून विकले जातील. |
| 14 | व्याजदर | निवेशकांना, नाममात्र मूल्यावर, दरसाल 2.50 टक्के ह्या स्थिर दराने, दर सहा महिन्यांनी भरपाई दिली जाईल |
| 15 | तारण | हे रोखे कर्जासाठी तारण म्हणून वापरले जाऊ शकतात. कर्ज/मूल्य गुणोत्तर (एलटीव्ही) मात्र, रिझर्व बँकेने वेळोवेळी अपरिहार्य केलेल्या सर्वसामान्य सुवर्ण-कर्जासाठी असल्याप्रमाणेच ठेवले जावे. |
| 16 | केवायसीचे कागदपत्र | तुमचा ग्राहक जाणा (केवायसी) साठीचे नॉर्म्स, प्रत्यक्ष सोने खरेदी करताना आवश्यक असलेल्या कागदपत्रांप्रमाणेच असतील. मतदार आयडी, आधार कार्ड/पॅन कार्ड किंवा टॅन/पासपोर्टची आवश्यकता असेल. |
| 17 | करविषयक वागणुक | आय कर अधिनियम 1961 (1961 चा 43) च्या तरतुदीनुसार, ह्या सुवर्ण रोख्यांवरील उत्पन्न करपात्र असेल. एखाद्या व्यक्तीबाबत एसजीबीच्या विमोचनामुळे निर्माण झालेल्या भांडवली-नफा कराला सूट देण्यात आली आहे. हे रोखे हस्तांतरित केल्यामुळे कोणत्याही व्यक्तीला मिळणारे दीर्घकालीन लाभांना इंडेक्सेशन लाभ दिले जातील. |
| 18 | व्यापार क्षमता | हे रोखे, ते दिले गेल्यानंतरच्या पंधरवड्यात, आरबीआयने अधिसूचित केलेल्या तारखेस, स्टॉक एक्सचेंजेसवर व्यापारक्षम असतील. |
| 19 | एसएलआर पात्रता | हे रोखे वैधानिक लिक्विडिटी रेशोसाठी पात्र असतील. |
| 20 | दलाली | ह्या रोख्यांच्या वितरणासाठीची दलाली, स्वीकारकर्त्या कार्यालयांना मिळालेल्या वर्गणीच्या 1% दराने दिली जाईल आणि एजंट्स किंवा सब एजंट्स ह्यांनी आणलेल्या व्यवसायासाठी त्यातील 50% दलाली, स्वीकारक कार्यालये, त्या एजंट्स किंवा सब एजंट्स बरोबर शेअर करतील. |

**अजित प्रसाद**

**वृत्तपत्र निवेदन : 2016-2017/2274**

सहाय्यक सल्लागार